**<u>सत्र खटला क्र. ६५/२०२०</u>** **<u>नि.क्र. २३</u> वर पुढे**
**सरकार वि. सुनिल येरणे**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

..........

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की—**

माझे नावः— शैलेशचंद्र प्रेमचंद्र यादव
वयः— ४९ वर्षे, व्यवसाय— वनपाल देवरी,
निवासस्थान— देवरी, ता. देवरी जिल्हा— गोंदिया

**<u>सरतपासणी सरकारतर्फे श्री. चुटे वकील यांचेतर्फे:—</u>**

सन २०१९ मध्ये मी गोरेगाव येथे वनरक्षक म्हणून कार्यरत होतो. दिनांक ०४.११.२०१९ रोजी वरिष्ठांच्या आदेशान्वये मी गोरेगांव पोलीस स्टेशन मध्ये गेलो होतो. एक मळकाम म्हणून वन मजुर माझया सोबत होते. पोलीस स्टेशन मधुन पोलीसां सोबत आम्ही कु—हाळी येथे गेलो. कु—हाळी मार्केट येथील एका ठेल्या मध्ये आमच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला व त्याची व्हीडीयो शुटींग करण्यात आली. घटनास्थळा वरून साधी माती व रक्त मिश्रीत माती जप्त करण्यात आली तसेच ज्याकॅमेराने व्हीडीयो शुटींग केली होती त्याची मेमोरी कार्ड सुध्दा जप्त करण्यात आली, व त्याचा पंचनामा तयार करण्यात आला. आता मला तो घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर बरोबर आहे. तो पुरावा कामी दाखल करून घेउन त्यास **निशानी २४** देण्यात येते. आता मला साधी माती व रक्त मिश्रीत माती जप्तीचा पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे तो पुरावा कामी दाखल करून घेउन त्यास **निशानी २५** देण्यात येते. आता मला व्हीडीयो शुटींगच्या वेळी जप्त करण्यात आलेला पेनड्राईव्हयु

जप्तीचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे तो पुरावा कामी दाखल करून घेउन त्यास निशानी **निशानी २६** देण्यात येते.

**उलटतपासणी आरोपी तर्फे तिवारी वकील साहेब यांचे द्वारेः—**

२. मला दारूचा व्यसन नाही. मी आज पर्यंत दारू प्यालेला नाही. निशानी २४ मध्ये माझे वय ६५ लिहले आहे ते चुकीचे आहे ते माझया वाचण्यात आले नव्हते, ते माझया नजरेतुन सुटले होते. मी सर्व पंचनाम्यावर पोलीस स्टेशन मध्ये सही केली. त्यावेळी ते पंचनामे मी वाचले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तीन्ही पंचनाम्यावरील सहीच्या खाली मी तारीख व वेळ लिहलेली नाही. दुस—या पंचाने सुध्दा पोलीस स्टेशन मध्ये सर्व पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसा सोबत घटना स्थळावर गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा माझया समक्ष केला होता. हे म्हणणे खरे नाही की सरकारी नौकर असल्यामुळे पोलीसांनी पंचनाम्यावर मेकॅनीकली सही केली. हे म्हणणे खरे नाही आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपासणी—** काही नाही.

वा.दा.ब.अ.क.के. श्रवणोत्तर स्विकृती

(ए.एस.प्रतिनिधी)
सत्र न्यायाधीश—१, गोंदिया.
दि. १२.११.२०२५